# ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले
# ता. माणगाव - जिल्हा - रायगड
## ई-निवीदा सन २०२६-२०२७ (1ST CALL)
## ई-निविदा सुचना

---

ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले, तालुका - माणगाव, जि.- रायगड यांचेकडील खालील कामाची निविदा योग्य त्या जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून **Percentage Rate Tender** दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदा बाबतची माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थलावर ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर उपलब्ध होईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदी फी | कामाची मुदत | आवश्यक कंत्राटदार | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | CONSTRUCTION OF MULTIPURPUS HALL AT DAHIWALI GOVELE V P DAHIVALI GOVELE TALUKA MANGAON DIST RAIGAD | 15,00,000 | 15,000/- | 590/- | 6 महिने | रा.जि. प. कडील नोंदणीकृत कंत्राटदार | 6 व त्या वरिल |

**<u>निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे</u>** –

1) सदरसंपूर्ण निविदा प्रक्रिया ई - निविदाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निवदा, नोटीस, सुचना, शुध्दीपत्रक इत्यादी माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.
2) वरील कामाची निविदेची http://www.mahatenders.gov.inया संकेत स्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.
3)

| तपशिल | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| संकेत स्थळावरून ई-निविदा प्रसिध्दी कालावधी | 15/05/2026 | 15:00 | 26/05/2026 | 15:00 |
| निविदा फोर्म व परिशिष्ट डाऊनलोड करण्याचा कालावधी | 15/05/2026 | 15:00 | 26/05/2026 | 15:00 |
| ई-निविदा सादर करणेचा कालावधी | 15/05/2026 | 15:00 | 26/05/2026 | 15:00 |
| ईनिविदा उघडणेचा तारीख व वेळ | दिनांक 28/05/2026- वेळ 15:00 वाजता | | | |

३)सदर निविदा प्रपत्रे पोस्टाने स्वकारली जाणार नाहीत.  ती स्कन करून ऑनलाईन सादर करावी.

4)  सदर निविदा दर सन 2026-2027 करिता मंजूर राहील.

5)  सदर निविदा पत्रास देय असणारी फी व अनामत रक्कम ऑनलाईन सादर करावीत.

6)  कोणतेही कारण न दाखवता निविदा नाकारण्याचा व स्विकारण्याचा अधिकार प्रसिध्दीधारकाने राखून ठेवला आहे.

7)  काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक आहे.  तसे न झाल्यास दंडात्मक कार्यवाहीहोईल.

8)  कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरवठा होणार नाही.

9)  निविदा दर हे Percentage  Rate  ने भरावयाचे आहेत.

10)  मागवलेल्या कागदपत्राचे सादरीकरण आवश्यक राहिल.

11)  करारनामा योग्य किमतीच्या मुद्रांक पेपरवर सक्षम अधिकारी दिले असतील अश्या अधिका-या समोर करून द्यावा लागेल.

12)  निविदे बाबत काही वाद उद्‌भवल्यास त्याबाबत ग्रामपंचायत निर्णय घेईल तो निर्णय निविदाधारकास बंधनकारक राहील.

१३) निविदा नोटीसमधील जर डांबरीकरणाची कामे असतील तर शासन परिपत्रक क्र.  संकीर्ण-2018/प्र.क्र.93/रस्ते-1/2018  दि.24  ऑगस्ट 2018  नुसार रक्कम रु.  50  लक्ष पर्यंत कामाकरिता हॉट मिक्स प्लॅन्ट स्वतःचा असणे आवश्यक नाही.

१४) बांधकाम व इतर कामाचे मजूर (रोजगार नियमन व सेवेच्या शर्ती)  अधिनियम 1996  व त्याखालील बनवण्यात आलेल्या विविध नियम यांचे पालन करावे.

१५) शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थांची /  सुशिक्षित बेरोजगार अभियंता कामे करण्याची सन 2020-21  मधील एकूण वार्षिक वित्तीय मर्यादा संपुष्टात आली आहे.  अशा मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता सदरची निविदेसाठी पात्र ठरणार नाहीत.

१६) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.सीएटी-2017प्र.क्र./इमा-2/मंत्रालय, मुंबई,दिनांक 26/11/2018 मधील मार्गदर्शन सुचणेनुसार स्पष्टीकरण खालील प्रमाणे,
दि. 27/09/2018 च्या शासन निर्णयातील परीच्छेदक्र.4.6.3(ब) मध्ये खालील प्रमाणे नमूद आहे.

देकार -15% पेक्षा कमी दराच्या असल्यास उर्वरित रक्क्मेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी. व्दारे सादर करणे अनिर्वाय राहील. उदा. 19% कमी दराकरिता (19-15=4) % x 2 =8%

ऐवजी

देकार - 15% पेक्षा कमी दराच्या असल्यास उर्वरित रक्क्मेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी. व्दारे सादर करणे अनिर्वाय राहील. उदा. 19% कमी दराकरिता खालीप्रमाणे पथ:करण

L - 1- निविदा धारकाने वरील मुदतीत “Additional Performance Security Deposit” भरणा नाही केला तर महाराष्ट्र शासन , सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परीपत्रक क्र.सीएटी-2017/प्र.क्र./इमा-2/मंत्रालय, मुंबई, दिनांक 27/09/2018 मधील 4.5.6 (छ) मार्गदर्शन सुचनेप्रमाणे L - 1 निविदाधारकाची EMD जप्त करून संबधित ठेकादारास काळ्या यादीत नाव समाविष्ठ करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१७) ठेकेदाराने कामावर आलेल्या मजुरांची यादी ग्रा. पं. कार्यालयात सादर करावी. तसेच कामावर आलेल्या सर्व मजुरांचा काम सुरु करण्यापूर्वी विमा काढण्यात यावा. अन्यथा प्रत्यक्ष काम करतेवेळी मजूर कर्मचारी अनावधानाने अपघात व दुखापत मृत्यु झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित ठेकेदाराची असेल. त्यासाठी ग्रामपंचायत मार्फत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

१८) महाराष्ट्र शासान, सार्वजनी बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी-1/2015/प्र.क्र.-20/इमा-2/मंत्रालय, मुंबई, दिनांक 24/04/2015 अन्वये म.स.स. व सु.बे.अ. यांना देण्यात येणाऱ्या संवर्गात स्पर्धा करून कामे घेता येतील सदर मर्यादा संपल्यानंतर त्यांना सामान्य कंत्राटदाराप्रमाणे खुल्या निविदामध्ये भाग घेवून कामे मिळवावी लागतील तसेच त्यांना इतर कोणत्याही सवलती देय राहणार नाही.

१९) सदर निविदे सोबत अपलोड केलेला B-1 फॉर्म (Tender Documents Form) निविदाधारकांने प्रथम डाऊनलोड (Download) करून सदर B-1 फॉर्म योग्य त्या ठिकाणी सही व शिक्का मारून या कार्यालयाकडे निविदा उघडल्यानंतर त्वरित जमा करावे.

२०) निविदा नोटीस मधील व करारनाम्यातील सर्व अति व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

२१) वरील कामाबाबत निधीचे उपलब्धतेनुसार पार पडलेल्या कामांचे भुगतान करण्यात येईल ह्या कारणामुळे झालेल्या विलंबाबाबत कोणतेही प्रकारचा दावा ऐकला जाणार नाही.

२२) वित्त विभाग शासन परीपत्रक जीएसटी-101/प्र.क्र.-81/कारधान-1/2017/दिनांक-19/08/2017मधील मुद्दा क्र.1 नुसार निविदा सादर करताना दिनांक-1/07/2017 नंतर लागू झालेल्या जीएसटीच्या कराच्या बोज्याच्या विचार करूनच निविदा सादर करावी.

२३) महाराष्ट्र शासन, सार्वजिनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी-2018/प्र.क्र.127/ इमा-2/ मंत्रालय, मुंबई, दिनांक 28/11/2018 अन्वये निविदे सोबत सादर करण्यात आलेली कागदपत्रे खोटी आढळून आल्यास भा.द.वि.स. अंतर्गत संबधिकतकंत्राटदारविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी ऑनलाईन खोटी कागदपत्रे करणारे कंत्राटदार जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

२४) महाराष्ट्र शासन, सहकार, पतन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. न्यायप्र.1516/प्र.क्र.245/9-स/ दि.21/01/2017 च्या आदेशाचे पालन करून सहाय्यक निबंधक/उपनिबंधक यांचेकडून पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करणे संबधित मजूर सहकारी संस्था यांना बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

२५)मा.अवर सचिव, ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील याचिका 2018/प्र.क्र. 198/बांधकाम -4 दि.12 ऑक्टोबर 2018 अन्वये अवगत केल्यानुसार मा.सर्वोच्च न्यायालयीन आदेशाचे पालन करणे आपणांवर बंधनकारक व अनिर्वाय आहे. आपण दिलेल्या निर्देशानुसार आपली व आपल्याकडील काम करणाऱ्या सर्व कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी करून त्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आपणांवर बंधणकारकराहील.

२६) या कामासाठी आलेल्या निविदा पैंकी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत. आणि निविदा पाठविणा-या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला (निविदा) फेटाळल्याबद्दल सपष्टीकरण मागता येणार नाही.

२७) निविदा उघडण्याच्यादिवशी काही तांत्रिक अडचण, इंटरनेटतसेचकार्यालयीन कामे यामुळेवेळेचा अभाव निर्माण झाल्यास सदरील निविदा त्या दिवसानंतरशासकीय वेळेनुसार इतर दिवशी उघडणेत येईल.

२८) सदर कामाच्या निविदे बाबत खालील बाबी अपलोड करणे आवश्यक राहतील.

- सदरील निविदा फी (TENDER FEE) व इसारा रक्कम (EMD)ऑनलाईन भरावी व त्याची प्रत ऑनलाईन तांत्रिक लिफाफ्या सोबत अपलोड करावी.
- सदर निविदेसाठी आवश्यक त्या गटानुसार रायगड जिल्हापरिषदे कडील नोंदणीकृत (CONTRACTOR RAGISTRATION COPY) कॉपी ऑनलाईन सादर करावी.
- PAN CARD व आधार कार्ड कॉपी ऑनलाईन सादर करावी.

- LAST 3 YEARS INCOME TAX RETURN ऑनलाईन सादर करावी.
- GST CERTIFICATE ऑनलाईन सादर करावी.
- PT CERTIFICATE ऑनलाईन सादर करावे.
- सत्यप्रतिज्ञालेख ५००/-रुपये च्या BOND पेपर वर ऑनलाईन सादर करावे.(Notary OR Affidavit Before Magistrate )
- मागील केलेल्या कामाचा तपशील (WORK DONE) STATEMENT FORMATE मध्ये ऑनलाईन सादर करावी.
- BID CAPACITY CERTIFIED BY C.A.ऑनलाईन सादर करावी.

ग्रामसेवक / सरपंच
ग्रा. प. दहिवली तर्फे गोवेले

Signature Not Verified

Digitally signed by MUMTAZ YUSUF BANDARKAR
Date: 2026.05.15 13:14:11 IST
Location: Maharashtra-MH